NASHIK DISTRICT MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ'S
**Karmaveer Adv. Baburao Ganpatrao Thakare College of Engineering**
KBTCOE
Affiliated to Savitribai Phule Pune University & Approved by AICTE New Delhi
Udoji Maratha Boarding Campus, Near Pumping Station Road, Gangapur Road, Nashik-422013, Maharashtra - India
Phone: +91 253-2571439, 2314319, Fax: 0253-2317016
email: principal@kbtcoe.org website: www.kbtcoe.org
NAAC 'A' GRADE INSTITUTE

## राष्ट्रीय सेवा योजना २०१७ विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना चे विशेष श्रमसंस्कार शिबीर बेळगाव ढगा येथे दिनांक १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर दरम्यान पार पडले.

दिनांक १९ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे उदघाटन श्री सचिन पिंगळे, संचालक म.वि.प्र. समाज याच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री दत्तू ढगे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सुद्धा मुलांना मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी खादी व ग्रामोद्योग भवन विद्यामंदिर बेळगाव ढगा येथे भेट देऊन विविध प्लांट ची माहिती करून घेतली.





दिनांक २० डिसेंबर रोजी, वॉर्ड न. ०२ मधील स्वच्छता व सर्व्हे करण्यात आला. त्यातून विविध समस्या जाणून घेतल्या. तसेच व्याख्यानमालेत श्री जयंत महाजन यांचे सोसिअल मीडिया व पत्रकरीता या विषयावर व्याख्यान झाले. तसेच प्रा. विक्रम काकुळते यांचेही नेतृत्व विकास या विषयावर व्याख्यान झाले.






दिनांक २१ डिसेंबर रोजी, वॉर्ड न. ०१ मधील स्वच्छता व सर्व्हे करून घेतला. श्री भूषण देशमुख यांचे सायबर सुरक्षा या विषयावर व्याख्यान झाले. त्यातून विदयार्थ्यांनी आपल्या अनेक शंकांचे निरसन करून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षाचे महत्व येथील लोकांना पटवून दिले.





दिनांक २२ डिसेंबर रोजी, वॉर्ड न. ०३ मधील स्वच्छता व सर्व्हे करून घेतला. श्री गोकुळ घुगे यांचे योगसाधना या विषयावर व्याख्यान झाले. संध्यकाळी लहान मुलांशी संवाद साधून त्यांना हॅन्ड वॉश चे महत्व पटवून दिले.










दिनांक २३ डिसेंबर रोजी, गावातील मैदानाची स्वच्छता केली. तसेच बारव व परिसराची स्वच्छता करून रंगरंगोटी केली.प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे मॅडम यांचे महिला सबलीकरण या विषयावर व्याख्यान झाले.












दिनांक २४ डिसेंबर रोजी, विद्यार्थ्यांनी एक वनराई बंधारा बांधून जल संवर्धनाचे काम केले.. तसेच संध्याकाळी मुलांनी व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन व तसेच महिला सबलीकरण या विषयावर पथनाट्य सादर केली व एक सामाजिक संदेश लोकांपर्यंत पोहचविला.




दिनांक २५ डिसेंबर रोजी, कार्यक्रमाचा समारोप श्रीमती नीलिमाताई पवार सरचटणीस म.वि. प्र. समाज याच्या हस्ते झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. तसेच सरपंच श्री दत्तू ढगे यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्य डॉ. कैलास होळकर, कार्यक्रम अधिकारी सोपान तळेकर उपस्थित होते.




प्रा.  सोपान तळेकर — डॉ. कैलास होळकर

कार्यक्रम अधिकारी — प्राचार्य